Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

IMPACT FACTOR:4.197(IIJIF)

ISSN: 2454-5503

# CHRONICLE
## OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

VOL. 4 NO. 6 SPECIAL ISSUE DECEMBER 2018

A Peer Reviewed Bimonthly International Journal

Special Issue On

## PROBLEMS AND CHALLENGES BEFORE THE WORKING WOMEN

*Guest Editor*

**Dr. Vasant Satpute**

*Associate Editor*

**Dr. Sunita Tengse**

*Assistant Editor*

**Dr. M. B. Patil**

*Mahatma Gandhi Education and Welfare Society's*

**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W)**

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



# कामकाजी महिला व पुरुषसत्ताक मानसिकता

डॉ. मोहन मिसाळ
इतिहास विभागप्रमुख
कै. रमेश वरपूडकर महाविध्यालय, सोनपेठ

भारतीय समाज हा विविध धर्म व प्रथा परंपरेनी नटलेला आहे. त्यामूळे भारतात विविधता दिसून येते. भारताची सध्याची लोकसंख्या ही 135 कोटी आहे. त्यापैकी निम्मी लोकसंख्या ही स्त्रीयांची गृहित धरली तरीही स्त्रीयांचे प्रमाण प्रचंड प्रमाणात दिसते. त्यामुळे सहाजिकच स्त्रीयांचा भाव भावना, विचार कर्तव्य व कृतत्व या सर्वांचा परिणाम समाज जिवनावर होत असतो. या आधुनिक युगात विविध नोक–यांची संधी स्त्रीयांना उपलब्ध होत असल्याने स्त्रीया स्वावलंबी होत आहेत. त्यामुळे अनेक समस्याचा ही निर्माण होत आहे. प्रस्तुतच्या शोध निबंधामध्ये या समस्यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

शोध प्रबंधाचा हेतू :–

1. स्त्रीयांच्या व्यवसायात बाबतीतल्या समस्या
2. स्त्रीया बददल पुरूषांचा दृष्टिकोन
3. स्त्रीयांच्या घरगुती समस्या यांचा अभ्यास करणे.

प्राचीन काळातील स्त्रीयांचे स्थान :–

भारताचा इतिहास लेखनात सुरूवात ही सिंधु संस्कृतीपासून होते. या काळातील अनेक स्त्रीयांच्या मुर्त्या उपलब्ध आहेत. यावरून तत्कालीन स्त्रीयांचे स्थान स्पष्ट होते. या काळात स्त्री ही सुखी व संपन्न असल्याचे दिसते. तिला मातृदेवता म्हणुन गणण्यात आले. मातृसत्ताक कुटुंबपदधतीत मातेला सर्व अधिकार होते. मातृ वंशक स्त्री सत्ताक स्त्री राज्यामध्ये केवळ दोनच वर्ण होते. क्षत्र आणि ब्राम्हण. क्षत्र म्हणजे शेती व पशूपालन करणारा आणि रक्षण करणारा परंतु पित्रसत्ताक मध्ये क्षत्राचा अर्थ क्षत्रिय झाला आणि त्यातून पुढे राज्य करण्याचा अधिकार मिळाला. स्त्रीराज्यात ब्राम्हण पासून ब्रम्हवादीनी बनली अर्थात राज्याचा कामकाज पाहणारी महिला होय. लोपामुद्रा , मैत्रेयी, गार्गी, घोषा, विश्वंवरा, शाश्वती आणि आदिती यांनी इतिहासात आपले नाव कोरले. यांशिवाय या काळातील स्त्रीयांनी संख्या, चारवाक, दर्शन स्त्रीयांनीही निर्माण केले अर्युवेदातील अनेक ऋचा या स्त्रियांनीच लिहिल्या गणसभेचे कामकाज पाहण्यासाठी 'पेवनी–पोत्यका' नावाचे संविधान स्त्रीयांनीच निर्माण केले होते. वेदामध्ये तंत्र शब्द येतो. तंत्र म्हणजे शेती होय. स्त्रियांनीच शेतीचा वापर सुरू केला. स्त्रियांनी नांगराचा वापर सुरू केला. अशा प्रकारे

स्त्रिया या समाजात विविध प्रकारच्या भुमिका पार पाडत होत्या. स्त्रि प्रधान असणा–या भारत देशात आर्यांच्या आकमनानंतर मात्र फरक पडला. आर्यांनी स्त्री सत्ता उलथून टाकून त्याऐवजी पुरूष सत्ताक पध्दती सुरू केली. आर्यांनी स्त्री राज्याचे स्वर्गात रूपांतर केले या तथाकथित स्वर्गात अनेक खोटया कल्पना निर्माण करण्यात आल्या. स्त्री राज्यात असलेल्या स्त्रियांना– स्वर्गात– अप्सरा, परी, नर्तकी बनवण्यात आल्या. इंद्राला रूझवणारी उर्वसी, मेनका यांसारख्या राष्ट्रप्रमुख असलेल्या स्त्रियांना देवांची सेवा करताना दाखवण्यात आले. स्त्री राज्यातील सर्व महत्वांच बाबींचे ब्राम्हणी करण करण्यात आले. स्त्रियांना केवळ भोगदाशी ठरवण्यात आले. तिने केवळ पुरूषांच्या राहण्यास भाग पाडण्यात आले. स्मृतिकाळात तर स्त्रीयांवरील अन्याय अत्याचाराचा कळस करण्यात आला. तिचे लग्नाचे वय व पर्या पर्यंतचे करण्यात आले. बालविवाहामुळे ती लवकर माता बनली. त्यामुळे तिचे शारिरिक कुपोषण होउन बालमृत्यू मोठया प्रमाणात झाले. लवकरच ती विधवा होउ लागली. पर्ण विवाहास बंधी घालण्यास आली. तिला शिक्षण घेण्यास बंधी घालण्यात आली. शिवाय संपत्ती पासून तिला वंचित ठेवण्यात आले. या सर्वामुळे समाजात फार भयानक परिणाम घडून आला स्त्री ही गुलाम बनली येणारी पिढी अज्ञानी व दुर्बल निपजली. परिणामी परकीय शक्तींना भारतावर आकमण करून तो जिंकता आला. इंग्रजी सत्ता भारतात प्रस्थापित झाल्यानंतर स्त्रीयांवर होत असलेल्या अन्याय अत्याचाराचा विरोधात सतीबंधी कायदा 1819 विधवा पुनर्विवाह कायदा 1856,इ. कायदे करून स्त्रियांची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न झाला. भारत स्वतंत्र झाल्यानंतर डॉ. बाबासाहेब अंबेडकरांनी भारतीय संविधानात हिंदु कोडविलची निर्मिती करून स्त्रियांना संपत्तीचा अधिकार बहाल केला. अशा प्रकारे आपण प्राचीन काळ ते आधुनिक काळपर्यंतचा स्त्रियांचा प्रवास पाहिला.

पुरूषसत्ताक मानसिकताः–

वर उल्लेख केल्याप्रमाणे मातृसत्ताक असणा–या समाजाची आर्यांनी कशा पध्दतीने पुरूषसत्ताक समाजात रूपांतर केले ते आता आपण पाहिले. आजही पुरूष याच मानसिकतेत कसा वागत आहे ते आता आपण पाहणार आहोत. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ मागास्वर्गियांचेच उध्दारकर्ते नसून ते संपूर्ण मानव जातीचे उध्दारकर्ते होते. स्त्रियांना त्यांनी मनुच्या विळयातून सोडले. संविधानाने स्त्रियांना समान दर्जा दिला. त्यांना मतदातनाचा व निवडणुकीचा अधिकार प्रदान करण्यात आला. शिवाय त्यांना 33 टक्के आरक्षण ठेवण्यात आले या सर्व कारणांमुळे स्त्रीया नोकरी करू लागल्या त्यामुळे त्यांच्यामध्ये परावलंबीत्व कमी होउन आर्थिक स्वावलंबत्व आले. परंतु जातिव्यवस्था हे भारतीय समाजाचे वैशिष्टये आहे. जातीमुळेच व्यक्तीला दर्जा व अधिकार प्राप्त होतात. व्यक्ती कितीही मोठी झाली तरी तिला जातीवरूनच ओळखले जाते. प्रत्येक जातिसमूहाच्या स्त्री शिक्षणाकडे व नोकरी करणा–या स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगवेळा दिसून येतो. हिंदु धर्माने जोडीदार निवडताना अनेक निर्बंध लादले आहेत. शक्यतो आपल्या जातीत विवाह करावा असे बंधन हिंदु धर्मात असते नोकरी करण्याचा स्त्रियांनासुध्दा अपवाद ठरत नाहीत. म्हणून केवळ आथिक स्वावलंबत्व आले. म्हणजेच सर्व काही प्रयत्न झाले असे नाही. फारच थोडे लोक जातीबाहय विवाह किंवा अंतर्धर्मिय विवाह करतात. याला कारणीभूत जातीय मानसिकता आहे. त्याशिवाय विवाहामध्ये जरी मुलगी नोकरी करत असली तरी तिला हुंडा दयावा लागतो. नोकरी करण्या–या स्त्रिया या नियमितपणे पुजा–प्रार्थना करतात परंतु या महिला कर्मकांडाचा विरोध करतात. म्हणजेच आधुनिक विचारसरणीचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला दिसतो.

नॅशनल काइम रेकॉर्ड युरो या संस्थेच्या अहवालानुसार भारतात दर 3 मिनिटाला एका महिलेवर अत्याचार होतो. दर 9 मिनीटाला पति किंवा नातेवाईक अत्याचार करतात. दर 19 मिनीटाला बलत्कार होतो. दर 51 मिनिटाला लैगिक शोषण होते. दर 77 मिनिटाला एक हुंडाबळी जातो. घरात छळ होण्याचे प्रमाण 40 टक्के एकढे आहे. काहींना बॉसकडून लैगिक छळ सहन करावा लागतो. स्त्रि ही उपभोग्य वस्तू आहे अशी पुरूष मानसिकता प्राचीन काळापासून आजपर्यंत कायम आहे. हयुमन डेव्हलपमेंट इंडेक्स अहवालानुसार दररोज एस. सी. प्रवर्गातील 4 स्त्रीयांवर तर 70 एस टी. प्रवर्गातील महिलांवर बलात्कार होतो. म्हणजेच आधुनिक युगातही बलात्काराचा वापर राजकिय हत्यार म्हणून केला जातो. कारण बलात्कार पिडीत व्यक्तींची लवकर पोलिस कार्यवाही केली जात नाही. त्यासाठी सामाजिक संघटनेदवारे आंदोलन केल्या जाते याला विरोध म्हणून दुसरे जातियवादी संघटन प्रतिमोर्चे काढतात. असेफा प्रकरणावरून हे जास्त स्पष्ट होते. थोडक्यात आजही स्त्री मंगती शिक्षित, अशिक्षित, वृध्द, बालक, वा कामकाजी असो ती पुरूष मानसिक व्यवस्थेचा बळी ठरत आहे. हे वास्तव आहे.

संदर्भ :-


1. नोकरी करणाऱ्या महिलांचा अभ्यास डॉ. टेंगसे सुनीता अप्रकाशित शोधनिबंध.
2. दे. लोकमत दे. पुण्यनगरी


□□□

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani